MAHARASHTRA STATE KHADI &
VILLAGE INDUSTRIES BOARD,
19/21, Manohardas Street, Fort, Mumbai - 400 001
TEL : Office 22617641-2-3 (G)
Fax : 022- 2269 68 08
E-mail : ceokvib@rediffmail.com
hokvib@rediffmail.com
(www.mskvib.org)

कार्यासन-३/ नियत किंमत दर/ परिपत्रक क्र. खाग्रामं/१०१९/नियत किंमत/दरपत्रक/२०२४-२५/ १२६३

दिनांक-२२/०७/२०२४

24 JUL 2024

## परिपत्रक

विषय- मंडळाच्या उत्पादनांची तपशीलवार माहिती ई-पोर्टलवर प्रसिद्ध करण्याबाबत.

संदर्भ- १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भाखंस २०१४/प्र.क्र.८२/भाग III/ उद्योग-४/दि/ .१ डिसेंबर,२०१६

२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. भांखस-२०२०/प्र.क्र.५७/उदयोग-४ दि.२० जुलै, २०२०

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. खाग्रामं/१०१९/नियत किंमत/दरपत्रक/२०२३-२४/१२७९/ दि.२१/०७/२०२३

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना महाराष्ट्रातील ग्रामीण व सुक्ष्म उद्योजकांना उद्योग उभारणी व उद्योग सुरळीत सुरु राहण्यासाठी मागील व पुढील दुवे उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आली. त्यानुसार मंडळामार्फत अशा ग्रामीण उद्योगांना त्यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना शासकीय खरेदीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या १९९२ च्या शासन निर्णयानुसार आरक्षण देण्यात आले होते. शासनाच्या विविध विभागांना लागणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी स्वतंत्र खरेदी धोरण उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भाखंस २०१४/प्र.क्र.८२/भाग-३/ उद्योग-४/दि/ .१ डिसेंबर,२०१६ परिशिष्ठ-२० मध्ये शासकीय महामंडळे/ उपक्रमामार्फत खरेदी करावयाच्या वस्तूंची यादी दिलेली आहे. शासन निर्णयातील परिच्छेद ५.१७ नुसार महाराष्ट्र शासन अंगीकृत शासकीय संस्था / महामंडळ यांच्याकडे नोंदीकृत संस्था / उद्योजक यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची क्षमता, वस्तूंची नावे संख्या तांत्रिक तपशिल नियत किंमत दर / दर निश्चिती इ. यादी दर वर्षी ३१ मार्च पुर्वी ई-पोर्टलवर (www.mskvib.org) प्रदर्शित करावी असे नमूद केले आहे.

सोबतच्या तक्त्यात परिशिष्ट नुसार दर्शविलेले सन २०२४-२५ ची नियत किंमत दर / दर निश्चिती हि पुढील नवीन नियत किंमत दर निश्चिती होई पर्यंतच्या कालावधीकरिता तांत्रिक तपशिल तांत्रिक मान्यतेसह ई-पोर्टलवर (www.mskvib.org) ग्राह्य राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी

23/7/2024

| | | MAHARASHTRA STATE KHADI & VILLAGE INDUSTRIES BOARD,<br>19/21, Manohardas Street, Fort, Mumbai - 400 001<br>TEL : Office 22617641-2-3 (G)<br>Fax : 022- 2269 68 08<br>E-mail : ceokvib@rediffmail.com<br>hokvib@rediffmail.com<br>(www.mskvib.org) |
|---|---|---|

जा. क्र. कार्यासन ३ / पणन / 1366 दिनांक. 30 JUL 2024

**विषय :- मंडळाच्या (www.mskvib.org) या संकेतस्थळावरील वस्तू व उत्पादनाची तांत्रिक तपशीलवार माहिती नियत किंमत दर बाबत शासकीय विभागांना खरेदी करणेकरिता अवगत करणेबाबत...**

**संदर्भ** :- १. शासनाचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग , शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र. ८२/ भाग III / उद्योग-४ / दिनांक १ डिसेंबर २०१६

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय भाखंस-२०२०/प्र.क्र.५७/उद्योग-४ दिनांक २० जुलै २०२०

३. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई यांचे परिपत्रक क्र.खाग्राम/१०९९/नियत किंमत/दरपत्रक/२०२३-२४/१२७९,दिनांक २१ जुलै २०२३

४. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई यांचे कार्यासन-३/ नियत किंमत दर/ परिपत्रक क्र. खाग्रामं/१०१९/नियत किंमत/दरपत्रक/२०२४-२५/१२६३/दिनांक २४/०७/२०२४

**महोदय,**

महाराष्ट्र राज्यात खादी व ग्रामोद्यागांना प्रोत्साहन देऊन, त्यांचे संघटन विकास व विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० (सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ नुसार) करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत ग्रामीण भागात सुक्ष्म उद्योग उभारुन त्यामार्फत ग्रामीण जनतेस रोजगार निर्मिती करण्यासाठी प्रयत्न केले जाते. यासाठी मंडळ २०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावात विविध ग्रामोद्योगांना अर्थ सहाय्य व मागील व पुढील दुवे (बॅकवर्ड ॲण्ड फॉरवर्ड लिंकिंजेस) उपलब्ध करुन देण्याचे काम करते. यासाठी या ग्रामीण उद्योगांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना/ मालास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचाही समावेश आहे.

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यध्दतीचा सुधारित नियम पुस्तिकेमध्ये नमूद केल्यानुसार मंडळाच्या नोंदणीकृत्त उद्योगांना शासकीय खरेदीमध्ये प्राधान्य देण्याबाबत पुस्तिकामधील मुद्दा क्र. ५.१७ मध्ये नमूद केले आहे. या संदर्भात शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस-२०२०/प्र.क्र.५७/उद्योग-४, दिनांक २० जुलै, २०२० नुसार मंडळाच्या उत्पादित वस्तुंचा पुरवठा, क्षमता, वस्तुंची नावे, संख्या, नियत किंमत इत्यादीची यादी दरवर्षी ३१ मार्चपूर्वी ई पोर्टलवर प्रदर्शित करण्याबबत पूर्ण मुभा / अधिकार असल्याबाबतचे संबंधित पत्राने कळविले आहे. (त्वरित संदर्भासाठी प्रत जोडली आहे.) शासनाच्या मान्यतेनुसार मंडळाच्या नोंदणीकृत्त उद्योजकांनी उत्पादित केलेल्या वस्तुंची यादी, किंमत इ. माहिती मंडळाच्या संकेतस्थळावर (www.mskvib.org) - Marketing प्रदर्शित करण्यात आली आहे. आपल्या जिल्हयामध्ये विविध विभागामार्फत शासनाच्या खरेदी धोरणातील परिशिष्ट २०, दोन मध्ये पुढील उद्योग / उत्पादनांचा समावेश आहे. त्याप्रमाणे हॅण्डमेड पेपर, हॅण्डमेड ड्रॉईंग पेपर, हॅण्डमेड ब्लॉटिंग पेपर, फाईल कर्व्हस व बोर्डस, फिनाईल, पोर्ट फोलिओ, आंघोळीचा तसेच सर्व प्रकारचे साबण, खाद्यतेल (घाणीचे) बॅरेक ब्लॅन्केटस, डिटर्जंट पावडर व डिटर्जंट केक, मेणबत्त्या, फर्निचर, दोरखंड व खादी हर्बल प्रॉडक्टस उदा. हर्बोटेक्स पावडर, हर्बोसॉल (डिलक्स), हर्बोक्लिन क्लीनर (डीएस), हर्बोफ्रेश (डिलक्स), हर्बोफिनॉल लिक्वीड, हर्बोनॉल सुपर लिक्वीड, हर्बोनॉल फोर्ट लिक्वीड, हर्बोसेट पावडर, हर्बोकेम लिक्विड, बॅरेक ब्लॅन्केटस प्रमाणेच कांबळया व डस्टर्स, गादी, उशी ची खरेदी करण्यात येत असते. या खरेदीमध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई यांचे मार्फत खरेदी केल्यास मंडळ त्या त्या जिल्हयात किंवा जवळच्या जिल्हयातील उद्योजकांना पुरवठा आदेश देऊन त्यांच्याकडून वस्तुंचे उत्पादन करुन घेईल. यातून आपल्या जिल्हयातील ग्रामीण कारागीरांना / उद्योजकांना रोजगार मिळेल व त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागेल. त्यामुळे या ग्रामीण कारागीरांचा रोजगारासाठी शहराकडे येणारा लोंढा काही प्रमाणात थांबवण्यास हातभार लागू शकेल. (सोबत दर निश्चित केलल्या वस्तुंची यादी व परिशिष्ट जोडत आहे.) तसेच सदर दर महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई यांच्या संकेतस्थळावर (www.mskvib.org) उपलब्ध करण्यात आले आहेत.

शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस- २०१४ / प्र.क्र.८२ / भाग III / उद्योग- ४, दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या शासन धोरणानुसार योग्य ती कार्यवाही करावी. वरील बाबींचा विचार करता आपल्या अधिनस्त सर्व शासकीय कार्यालये यांना शासनाचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखंस- २०१४/प्र.क्र.८२/भाग III /उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर २०१६ च्या शासन धोरणानुसार उत्पादनांची खरेदी जास्तीत जास्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मुंबई यांच्या मार्फत खरेदी केल्यास त्या त्या जिल्हयात किंवा जवळच्या जिल्हयातील ग्रामीण कारागीरांना / उदयोजकांना रोजगार मिळेल व त्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागेल.

विविध शासकीय विभागाचे पुरवठा आदेश **मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१ मनोहर दास मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१** यांच्या नावे काढण्यात यावेत. मंडळाच्या नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म ग्रामीण उद्योजकांच्या माध्यमातुन उत्तम प्रतीच्या वस्तुंचा पुरवठा मंडळामार्फत करण्यात येईल तसेच मा. पंतप्रधान यांनी (Vocal for Local) या घोषणेनुसार ग्रामीण उत्पादनांना स्थानिक पातळीवर बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यास मदत करावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ**
**मुंबई ४०० ००१**

३०/१/२०२४

प्रति,

**१. आयुक्त शिक्षण,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे**
**२. आयुक्त कृषी,**
**महाराष्ट्र राज्य पुणे-१**
**३. आयुक्त,**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजन आयुक्तालय, नवी मुंबई**
**४. आयुक्त,**
**महिला व बाल विकास विभाग, पुणे**
**५. आयुक्त,**
**समाज कल्याण विभाग, पुणे**
**६. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान आरोग्य भवन, मुंबई**
**७. आयुक्त,आदिवासी विकास आयुक्तालय,नाशिक**
**८. जिल्हाधिकारी, (सर्व)**
**९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)**
**१०. जिल्हा पोलीस अधीक्षक, (सर्व)**
**११. संचालक,प्राथमिक शिक्षण संचालनालय,पुणे**
**१२. सह संचालक,आरोग्य सेवा संचालनालय,मुंबई सर्व जिल्हे –**
**१३. शासकीय कार्यालयाचे कार्यालय प्रमुख, (सर्व)**

३०/१/२०२४

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ**
**मुंबई ४०० ००१**